**आदेश नि. क्र. १ खाली एम. जे. सी. क्र. १२५४ / २०२५**
**दिनांक : ०६/०५/२०२६**

प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केले आहे.

२. अर्जातील तथ्ये खालीलप्रमाणे :

अर्जदारांचे मामा नामे मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांचा अविवाहीत असताना **दि. १४/०३/२०२५** रोजी पांढुर्णा, ता. व जि. पांढुर्णा येथे मृत्यू झाला आहे. तसेच मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांचा भाऊ नामे शेषरावराव बोकडे यांचा देखील अविवाहीत असताना पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झाला आहे. तसेच मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांच्या आई–वडिलांचा देखील पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झालेला आहे. मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांची बहीण नामे चिरकुटाबाई जानरावजी डखरे यांचे लग्न होऊन जरूड येथे दिले होते. तिचा सुद्धा पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झाला आहे. मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांचा अर्जदार क्र. १ हा भाचा व अर्जदार क्र. २ ही भाची कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी विद्यमान दिवाणी न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी सदरचा अर्ज विद्यमान न्यायालयात दाखल केला आहे.

३. सदरच्या अर्जावर हरकत नोंदविण्याकरिता स्थानिक दैनिक वृत्तपत्र **दैनिक वरूड दर्पण** मध्ये जाहीर प्रसिद्धी दिनांक **२४/१२/२०२५** रोजी **नि. क्र. १४** अन्वये करण्यात आली. परंतु, त्यावर आजतागायत कोणीही हरकत नोंदविली नाही.

४. अर्जदारातर्फे वकील **पी. आर. गोवणे** यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांची पडताळणी केली.

५. अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार क्र. १ यांनी **नि. क्र. ०९** अन्वये स्वत:चे पुरावा शपथपत्र दाखल करून पुरावा नोंदविला. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांचे व अर्जदार क्र. २ यांचे मामा नामे मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांचा अविवाहीत असताना **दि. १४/०३/२०२५** रोजी पांढुर्णा, ता. व जि. पांढुर्णा येथे मृत्यू झाला आहे. तसेच मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांचा भाऊ नामे शेषरावराव बोकडे यांचा देखील अविवाहीत असताना पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झाला आहे. तसेच मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांच्या आई–वडिलांचा देखील पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झालेला आहे. मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांची बहीण नामे चिरकुटाबाई जानरावजी डखरे यांचे लग्न होऊन जरूड येथे दिले होते. तिचा सुद्धा पुष्कळ वर्षांपूर्वी मृत्यू झाला आहे. त्यामुळे मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांचा अर्जदार क्र. १ हा भाचा व अर्जदार क्र. २ ही भाची कायदेशीर वारस आहेत. त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी विद्यमान दिवाणी न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची

आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज विद्यमान न्यायालयात दाखल केला आहे.

६. अभिलेखावरील दस्तऐवज **नि. क्र. १० ते १४, १८** ची पडताळणी केली असता असे दिसून आले की, **धनराज सदाशिव बोकडे** यांचा मृत्यू **दि. १४/०३/२०२५** रोजी झाला आहे. अभिलेखावरील उपलब्ध मौखिक व लेखी पुराव्याचे अवलोकन केले. तसेच अर्जावर कोणतीही हरकत नोंदविण्यात न आल्यामुळे अर्जदारांच्या कथनावर अविश्वास करता येणार नाही आणि त्यावरून अर्जदार हे मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांचे औपचारिक वारस असल्याचे निष्कर्ष नोंदवित आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये सर्व अर्जदारांना मयताचे वारस घोषीत करून वारस प्रमाणपत्र बहाल करणे न्यायोचीत राहील. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये अर्जदार क्र. १ हनुमंता जानराव डखरे आणि अर्जदार क्र. २ मंगला सुरेशराव अंबाडकर हे मयत **धनराज सदाशिव बोकडे** यांचे औपचारिक वारस असल्याचे प्रमाणपत्र कायदेशीर मुद्रांक शुल्काचा भरणा केल्यावर प्रदान करण्यात यावे.

**३.** सदर प्रमाणपत्रावर दिवाणी नियमावली परिच्छेद क्रमांक ३१२ मधील टीप नोंदवावी.

**४.** सदरहू अर्जदार यांना नियमानुसार कोर्ट फी भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

**५.** सदरहू वारस प्रमाणपत्र हे अर्जदार यांना फक्त शासकीय व निमशासकीय कामांकरिता देण्यात येत आहे.

**६.** प्रकरण निकाली काढण्यात आले.

JAYA SURESHRAO THAKARE

Digitally signed by JAYA SURESHRAO THAKARE
Date: 2026.05.06 16:42:10 +0530

**(श्रीमती जे.एस.ठाकरे)**

दिनांक :– ०६/०५/२०२६

२ रे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
वरूड